Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिक्षण

प्रा. आशिष रमेश बोरकर
समाजशास्त्र विभाग प्रमुख
स्व. पार्वताबाई मदनकर कला व वाणिज्य महाविद्यालय,वरठी,
त. मोहाडी, जि. भंडारा.

डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य हे त्यांच्या आयुष्यभराच्या माणुसकीच्या लढयाचे एक नवप्रभावी साधन म्हणून प्रकट होते. अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे सर्वोच्च पदव्या मिळवित असताना अस्पृश्यतेचा, जातियतेचा जीवनभर संघर्ष करावा लागला. निरंतर विद्याभ्यासाने त्यांचे व्यक्तिमत्व सूर्याप्रमाणे दैदिप्यमान झाले होते. विविध गुणांनी डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्व घडले. त्यांनी विविध ग्रंथातून, संपादकीय लेखन विपूल प्रमाणात केले. अशा परिस्थितीत त्यांचे शैक्षणिक चिंतन समग्रपणे व विस्ताराने कुठेही फारसे उपलब्ध नाही. तसेच ते विखुरलेले व प्रासंगिक असल्याने शिक्षणतज्ञ म्हणून त्यांचे चिंतन काय आहे हे जाणून घेण्याकरीता, डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य समजून घेण्यासाठी त्यांचे विविध लिखान, भाषणे, वृत्तपत्रे याचे अध्ययन करणे आवश्यक आहे. त्यांचे विचार वेगवेगळया प्रसंगी व वेगवेगळया निमित्याने मांडलेले आहेत. त्यांनी शिक्षण, शिक्षणसंस्था, शिक्षक, शिक्षणपध्दती, सरकारचे शिक्षणासंबंधी कर्तव्य इ. विविध बाबींवर प्रकाश टाकला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र, समता, बंधूता आणि सामाजिक न्याय या तत्त्वांवर आधारित भारतीय राज्यघटनेने साकारलेल्या भारताच्या भावी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांची स्पष्ट झलक दिसून येते. त्यांच्या शिक्षण विचारामधून त्यांना अभिप्रेत असलेले शिक्षण, शिक्षणसंस्था, शिक्षक, प्राध्यापक, विद्यापीठीय शिक्षण त्यातून होणारे संशोधन, दलितांचे शिक्षण व एकूण सरकारचे शिक्षण विषयक धोरण इ. अनेक बाबींवर अत्यंत सुक्ष्म व परखड विचार मांडलेले आहेत.

डॉ. आंबेडकर हे अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतही भावी भारताच्या शिक्षणाचा वेध घेणारे शिक्षणतज्ञ या नात्याने स्वातंत्रपूर्ण व स्वातंत्र्योत्तर काळात वावरताना दिसतात. त्यांच्या या दृष्टेपणाचा वेध घेताना प्रा. रामदास बागेश्वर म्हणतात, 'हया काळाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले विचार आजच्या काळातही लागू पडताना आपल्याला दिसतात. त्याकाळी त्यांनी दिलेले सावधतेचे इशारे आजही आपल्याला सावध करतात व यातून त्यांची दूरदृष्टी प्रत्ययाला येते. डॉ. आंबेडकर यांच्या अभ्यासातून, अनुभवातून, निरीक्षणातून आणि चिंतनातून हे विचार आल्यामुळे त्यांना चिरंतर मुल्य प्राप्त झाले आहे.'

ज्या दलित समाजामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. त्या समाजास स्वातंत्र्यपूर्व भारतीय समाज व्यवस्थेत अस्पृश्य मानून त्यांच्या सावलीचाही विटाळ मानला जात होता. त्यांना कुत्र्या.मांजरापेक्षाही हीन जीवन जगावे लागत होते. म्हणून स्वतंत्र भारताच्या स्वराज्यामध्ये दलितांचाही सहभाग असावा, त्यांनाही माणूस म्हणून जगता यावे, याकरिता भारतीय समाजाची समतेच्या आधारावर पुनर्रचना झाल्याशिवाय भारताची प्रगती होणार नाही. ही जाणीव भारतीयांमध्ये निर्माण होण्याची गरज आहे. शिक्षणाने ही जाणीव निर्माण करता येईल. म्हणून त्यांना शिक्षणाचे महत्व वाटत होते. शिक्षणाचे स्वरूप विशद करतांना ते म्हणतात की, 'व्यक्तीला जाणीव (Realization) देते ते शिक्षण' अशी शिक्षणाची त्यांनी व्याख्या केली. शिक्षणाचे महत्त्व विशद करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, ''उपासमारीने शरिराचे पोषण कमी झाल्यास मनुष्य हतबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जीवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो म्हणून लोकांच्या मनाची व सामाजिक दर्जाची उंची वाढविणे म्हणजे शिक्षण होय, शिक्षण हाच राष्ट्रीय उन्नतीचा मूलमंत्र आहे.' सामाजिक क्रांती घडवून आणायची असेल तर त्याची बिजे बालवयातच रूजविली पाहिजेत. त्यांच्या मते, शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे एक साधन असून भारतीय लोकशाहीला अपेक्षित असा स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांवर आधारीत समाजशिक्षणाने निर्माण करता येईल यावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणून शिक्षणाचे धोरण काय असावे हे सांगताना ते म्हणतात 'भारतात बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक लोकशाहीचा ज्याद्वारे विकास होईल अशी मनोवृत्ती घडविणे हे शिक्षणाचे कर्तव्य आहे.' असा राष्ट्रीय शिक्षणाचा विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला. शिक्षण ही एक पवित्र संस्था मानीत होते. शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करून समाजास योग्य वळण लावावयाचे असते. 'शाळा हे उत्तम नागरिक तयार करण्याचे उदात्त कार्यक्षेत्र आहे' असे त्यांचे मत होते.

शिक्षण म्हणजे परिवर्तन :—

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन होय यावर डॉ. आंबेडकरांची निष्ठा होती. शिक्षण ही विकासाची पायवाट त्यांना वाटत होती. क्रांती आणि परिवर्तन शिक्षणाशिवाय होऊ शकणार नाही. हे क्रांतीचे गती विज्ञान त्यांनी उद्घोषित केले होते. शिक्षण म्हणजे परिवर्तन हे त्यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे मुख्य सुत्र होते. शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन आहे. म्हणून प्रत्येकाने शिक्षण घ्यायला पाहिजे असेही त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. शिक्षणाच्या माध्यमातून माणसाला घडविता येते. ''जे माणूस घडविते तेच खरे शिक्षण होय''. शिक्षणामध्ये ज्ञान आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम असतो. शिक्षण हे मूल्याधिष्ठित म्हणजे उच्चत्तम नैतिक आचरण निर्माण करणारे असावे.

"For ours is a battle, not a battle for wealth or for power, It is a battle for freedom. It is a battle for the eclamation of human personality which has been suppressed and multilated by the Hindu social system and will continue to be suppressed and multilated if in the political struggle the Hindus in and we lose my final words of advice to you is EDUCATE, AGITATE AND ORGANIZE, have faith in yourselves and never lose hope I shall always be with you as I know you will be with me.

अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार होऊन त्यांच्यातील अज्ञान, धर्मभोळेपणा नष्ट व्हावा आणि त्यांच्यातील अज्ञानाचा फायदा घेवून उच्चवर्णीयांकडून होणारी पिळवणूक थांबावी, त्यांच्यात शिक्षणामुळे आत्मविश्वास निर्माण झाल्यामुळे प्रगतीचा दिशेने त्यांना पाऊल टाकता येईल असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. परंतु फक्त प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षणाच्या प्रसाराने हा उद्देश साध्य होणार नसुन उच्चशिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे समाजात चांगले नेते तयार होतील आणि समाजाची उन्नतीच्या दिशेने वाटचाल सुरू होईल. या अपेक्षेने डॉ. आंबेडकरांना उच्च शिक्षणाचे महत्व वाटत होते. उच्च शिक्षणाच्या प्रसाराच्या हेतुनेच त्यांनी शिक्षण संस्था स्थापना करून त्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल टाकले. डॉ. आंबेडकरांना पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून फक्त भारतात बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक लोकशाहीचा विकास करावयाचा नव्हता तर उच्च शिक्षणाचाही प्रसार करावयाचा होता. अशी लोकांची मनोवृत्ती घडवून आणण्याचे कार्य करावयाचे होते. ही देशाची गरज असल्याने भारताविषयी सदिच्छा बाळगणाऱ्या सर्व जनतेने ही बाब या देशात घडवून आणली पाहीजे अशी अपेक्षा डॉ. आंबेडकरांनी या संस्थेचे धोरण जाहिर करतांना व्यक्त केले.

भारताच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची पुनर्मांडणी करणे अगत्याचे आहे. परंपरागत दृष्टिकोन सोडून संविधानाच्या प्रकाशात आपण हे धोरण ठरविले पाहिजे. शिक्षणाचा बहुव्यापी आयाम लक्षात घेऊन त्याचा इतर विकासाशी संबंध प्रस्थापित करता आला पाहिजे. शिक्षण व विकासाचे संपूर्ण धोरण संविधानबद्ध आहे. भारतीय समाजाची पुनर्रचना करण्याकरिता शैक्षणिक धोरणाची नव्याने मांडणी करण्याची आवश्यकता आहे. भूक, श्रम आणि शिक्षण यांचा अन्य संबंध आदि काळापासून आहे. कार्यानुभव, व्यवसाय व उच्च तांत्रिक शिक्षण अशी नव्याने फेरमांडणी करावी लागणार आहे. आंगणवाडीतील खेळीमेळीतून मुलाचे होणारे संगोपन, प्राथमिक शिक्षणाचा पाया ठरत असल्याने ते शिक्षण देणारे शिक्षक, तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक शिक्षण झाले पाहिजे, ही खबरदारी धोरणातून व्यक्त होणे आवश्यक वाटते. शिक्षणात शारीरिक शिक्षण, क्रीडा व लष्करी शिक्षण असले पाहिजे. नोकरीत शिरणाऱ्या उमेदवाराला लष्करी शिक्षण आवश्यक करता आले तर अधिक चांगले. मागासलेल्या वर्गांना सामाजिक अभिसरणाच्या प्रवाहात सामिल करून घेण्याकरिता विशेष कार्यक्रमाची निर्मिती केली पाहिजे. शिक्षणावरील सध्याचा अपव्यय टाळून त्याला सक्त नियंत्रणात आणणे आवश्यक आहे. वास्तविक शिक्षणासारख्या अति महत्वाच्या विषयाचे केंद्रीकरण करणे महत्वाचे ठरते. शिक्षणावर केवळ चर्चा, परिसंवाद आयोजित करून काहीही साध्य होणार नाही. बुद्धिभ्रम निर्माण होण्यास ती कारणीभूत ठरू शकतात. जेव्हा शैक्षणिक धोरण संविधानात समाविष्ट आहे, त्यावर चर्चा करण्याचे कारण नाही. त्याची केवळ अंमलबजावणी करण्याचे तेवढे काम असते.

विद्यापीठीय आणि शिक्षण :—

डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणाच्या संदर्भात केवळ प्राथमिक शिक्षण मिळून आज मागासलेला समाज पुढे येणे शक्य नाही त्यांना उच्च शिक्षण दिले पाहिजे असे सांगितले. विद्यापीठात दिले जाणारे शिक्षण समाजाभिमुख असावे, ते विज्ञाननिष्ठ आणि पक्षपात विरहित असावे. कोणत्याही विशिष्ट समाजघटकांच्या हितसापेक्ष नसावे. शिक्षणाचा उद्देश सिद्धांत शिकविणे वा नुसती माहिती पुरविणे नसावे तर त्यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होवून त्यांच्या मानसिक व बौद्धिक क्षमतांची वाढ व्हावी.

सत्याचा शोध घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी. उपलब्ध पुराव्याचे योग्य मूल्यमापन करावे, तर्काचा पाठपुरावा करावा, विद्वानांच्या मतावर भाष्य करावे, या सर्वासाठी विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित करणे हे विद्यापीठाचे ध्येय असावे. विद्यापीठाच्या अनेक महत्वपूर्ण आणि मुलभूत कार्यांपैकी एक कार्य म्हणजे गरजू आणि गरीबांच्या दारापर्यंत शिक्षणाच्या सोयी पोहचविणे आहे. सुसंस्कृत देशातील कोणतेही विद्यापीठ फक्त परीक्षा घेवून आणि पदवीदान करून आपली सार्थकता सिद्ध करू शकणार नाही. मागासवर्गीय जातींना उच्च शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे कोणत्याही आधुनिक विद्यापीठाचे प्रथम कर्तव्य आहे. विद्यापीठ ही मध्यवर्ती संस्था असावी व महाविद्यालये त्याला संलग्न असावे. व्यवस्थापनेच्या दृष्टीने महाविद्यालये स्वायत्त असावी. थोडक्यात 'महाविद्यालयाचा समूह म्हणजे विद्यापीठ, आणि विद्यापीठ म्हणजे महाविद्यालयाचा समूच्चय' हया धर्तीवर विद्यापीठाची पुनर्रचना करण्यात यावी. मुंबई विद्यापीठाचे धोरण म्हणजे नुसत्या परीक्षा घेणे, शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या नावाखाली परीक्षा पद्धतीत कडकपणा आणणे असा आहे. परीक्षा आणि शिक्षणाचा दर्जा हया दोन वेगळया गोष्टी आहेत. शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या नावावर परीक्षा पद्धती अत्यंत कठोर व अशक्य केल्यामूळे मागासवर्गीय व दलित विद्यार्थ्यांचे अतिशय नुकसान होते. परीक्षेला असलेल्या सर्वच विषयात एकाच प्रयत्नात पास झाले पाहिजे अशी विद्यापीठाची अपेक्षा आहे. ज्यांचे पालक श्रीमंत आहेत, ज्यांना दिवसा महाविद्यालयात जाण्यासाठी पुरेसा वेळ आहे आणि जे आपला पूर्ण वेळ शिक्षणासाठी देवू शकतात त्यांना या बाबीचे विशेष महत्व नसेलही, पण जे पालक दरिद्री आहेत, ज्यांच्या मुलांना दोन वेळचे जेवन मिळावे म्हणून दिवसा काम करून कुटूंबाच्या उत्पन्नात भर घालावी लागते, त्यांना दिवसाच्या बारा तासांपैकी फार कमी वेळ मिळतो. विद्यापीठाला मागासवर्गीयांच्याच आर्थिक परिस्थितीची जाणीव असती तरी विद्यापीठाने अशा परीक्षा पद्धतीचा आग्रह धरला नसता. विद्यापीठातील सिनेट हे विधानमंडळ असून, मागासवर्गीयांच्या प्रश्नांना वाचा फोडणे आणि त्या समस्यांच्या निवारणाचे मार्ग व उपाय सुचविणे यासाठी मागासवर्गीयांना सिनेटवर प्रतिनिधीत्व हवे आहे. विद्यापीठाचे शिक्षण हे समाजभिमुख असायला पाहिजे. विद्यापीठातील उच्च शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्यापुरते नसावे. हाच फक्त शिक्षणाचा उददेश नाही तर ते कार्य समाजाच्या उन्नतीकरिता असायला पाहिजे. तळागाळातील लोक उच्चशिक्षण कशाप्रकारे घेतील याचा विचार सरकारने करायला पाहिजे. तसेच शतकानुशतके गुलामगिरीत जगणाऱ्या लोकांना मुक्त होण्यासाठी व त्या मानसिकतेमधून मुक्त होण्यासाठी शिक्षण हाच मुलभूत उन्नतीचा मार्ग आहे. असे डॉ. आंबेडकरांनी सांगितले. यावर तत्कालीन राजकीय व्यवस्थेनी लक्ष दयायला पाहिजे. महात्मा ज्योतिबा फुले नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणावर सरकारने जास्त खर्च करावा जेणेकरून सर्व स्तरातील लोकांना शिक्षणाचा लाभ घेता येईल असे स्पष्ट केले होते. परंतु आज शिक्षणावर पाहिजे त्या प्रमाणावर खर्च होत नाही. उलट शिक्षणाचे खाजगीकरण केल्यामुळे सर्वसामान्यांना शिक्षण घेणे कठीण झाले आहे. शैक्षणिक केंद्रे समाजाभिमुख दृष्टिकोनातुन शिक्षण दिले पाहिजे. अशा प्रकारचा दृष्टिकोन डॉ. आबेडकरांना अभिप्रेत होता. शिक्षणाचा मुलभूत उद्देश जागृती निर्माण करणे हा आहे. व्यक्तीला शिक्षणामुळे सामाजिक, राजकीय, आर्थिक जाणीव निर्माण होते हा शिक्षणाचा उद्देश आहे. त्यामुळे प्रत्येकाला सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे. प्राचीन काळापासुन भारतीय इतिहासात अनेक वाईट रूढी, प्रथा, परंपरा, चालीरीती चालत होत्या. अनेक शतकापासुन अंधश्रद्धा दूर होतील व खऱ्या अर्थाने सत्याची जाणीव हाईल हा शिक्षणातील महत्वाचा फायदा होय. यासाठीच समाजातील सर्व स्तरातील लोकांनी शिक्षण घेतले पाहिजे तरच शिक्षणाचा खरा उददेश साध्य होऊ शकतो.

संदर्भग्रंथ (References)

१. गवळी टी.ए. (संपादक) : 'डॉ.आंबेडकर गौरव ग्रंथ', नंदिनी गवळी प्रकाशन, प्रथम आवृत्ती (१९९१), पृ.क्र. ५१.
२. डॉ. आंबेडकर बी.आर., देविदास घोडेस्वार (अनुवाद) : 'दलितांचे शिक्षण' समता प्रकाशन नागपूर (१९९७), पृ.क्र. ११६.
३. पीपल्स एज्युकेशन सोसायटी : 'सिल्वर ज्युबीली सेव्हिनीअर', मुंबई (१९७४).
४. शिक्षण समीक्षा : जानेवारी १९९१, गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई (१९९३), पृ.क्र. ४२४.
5. Report of Depressed Class Conference, Nagpur, Session 18, 19 & 20 July 1942.
6. Dr. Babasaheb Ambedkar: 'Writing and Speeches', Education Department, Govt. of Maharashtra, Vol.2 (1982)
७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : 'लेखन आणि भाषणे खंड १८, भाग १', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन (२००२).